ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या आठ जणांची टोळी पकडली

एजंटला देण्यात येते लाखो रुपयांचे कमिशन

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २६ :**

ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या आठ जणांची टोळी ग्रामिण पोलिसांनी मुंबईतून पकडली. या टोळीचा मुख्य सूत्रधार विदेशात असूनही तोच या टोळीला सूचना करतो व एजंट त्यानुसार काम करतात. ही टोळी खातेधारक तयार करण्यापासून त्यांना मोठ्या शहरात घेवून जाण्याचे, फसवणुकीची रक्कम सर्वसामान्यांच्या खात्यातून मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचेपर्यंत खातेधारकांवर लक्ष देण्याची जबाबदारी एजंटची राहते. या कामासाठी एजंटला तीन ते चार दिवसात २ ते ३ लाख दिले जात असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीचे आमिष देवून ऑनलाइन रक्कम लुबाडण्याचे फ्रॉड अलीकडे वाढलेले आहेत. या फ्रॉडचा मास्टर माईंड विदेशात बसून, देशातील नागरिकांना गंडवत आहे. दरम्यान सर्वसामान्यांकडून लूटलेली रक्कम फिरवण्यासाठी गुन्हेगारांना बँक खाते महत्वाचे आहे, त्यामुळेच एजंटकडून पार्ट टाईम जॉबच्या नावाखाली बँक खाते काढून घ्यायचे, ज्यांची खाते काढली, त्यांना मोठ्या शहरातील एका हॉटेलमध्ये थांबवून त्यांच्याच खात्यावरुन फसवणुकीच्या रकमेची विल्हेवाट लावली जाते. यासाठी खातेधारकाला नवीन मोबाइलसुद्धा दिला जातो. दरम्यान एका खातेधारकाला तीन ते चार दिवसांपेक्षा जास्त थांबवत नाही किंवा त्याच्या खात्याचा वापर करत नाही. मात्र या तीन ते चार दिवसात बँक खातेधारक अप्रत्यक्षपणे एजंटच्या नजरकैदेत असल्याप्रमाणे असतो. त्याच्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारीसुद्धा एजंटचीच राहते.

खातेधारकाचे ओटीपी पोहोचतात मुख्य सूत्रधाराकडे फसवणुकीची रक्कम ज्यावेळी खातेधारकाच्या बँक खात्यात येते, ही रक्कम खातेधारकाच्या खात्यातून मुख्य सूत्रधाराकडे वळवायची राहते, त्यामुळे रक्कम काढण्यासाठी बँक खातेधारकाला ओटीपी पाठवते. हे ओटीपी बँक खातेधारकाला माहीत न होता थेट मुख्य सूत्रधाराला मिळते, यासाठी एक अप्लीकेशन स्मार्ट फोनमध्ये एजंट खातेधारकाच्या मोबाइलमध्ये डाऊनलोड करुन देतात. हे अप्लीकेशन कार्यरत ठेवण्यासाठी मोबाइलची स्क्रिन नियमित सुरू ठेवावी लागते. मात्र हे ॲप केवळ सायबर क्राईम करणाऱ्या मुख्य सूत्रधाराकडेच आहे, अशी माहिती ग्रामिण सायबर ठाण्याचे प्रमुख पीआय धीरेंद्रसिंग बिलवाल यांनी दिली.

अचानक आलेल्या पुरामुळे शेतमजुर अनेक तास अडकले

■ **महासागर प्रतिनिधी, अंजनगाव सुर्जी, दि. २६ :**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील चौसाळा तुरखेड या पांदन रस्त्यावर शिंगमोडी नदीला पूर आल्याने परिसरातील अनेक मजुर एका बाजुला अडकले होते. शेवटी मानवी साखळी तयार करुन त्यांनी एक-दुसऱ्याला बाहेर काढले. अचानक आलेल्या पावसामुळे सदर नदीला पूर आला. त्यामुळे हे मजूर अडकले होते. दरम्यान या घटनेमुळे सदर नदीवर पुल उभारण्याची जुनी मागणी पुढे आली असून प्रशासनाने त्याकडे लक्ष द्यावे, असे या भागात मजुरीसाठी जाणाऱ्या मजुरांसह शेतमालकांचे म्हणणे आहे. संबंधितांच्यावतीने शेतकरी विनोद वानखडे यांनी याबाबत पत्रव्यवहारही केला आहे.

सध्या पेरणीची लगबग सुरु आहे. त्यामुळे शेतमालकांसह मजुरांना या रस्त्याने वारंवार ये-जा करावी लागते. दरम्यान मुसळधार पाऊस आल्यास शेतातील कामे खोळंबतात. त्यामुळे त्यांना घरी परत जाण्यासाठी शिंगमोडी नदीजवळ अडकावे लागते. या घटनेमुळे ते अक्षरश: हादरले असून शेतकरी व मजुरांनी मानवी साखळी तयार करुन एक-दुसऱ्यांची सुटका केली. दरम्यान येत्या काळात पुल न झाल्यास आम्हाला तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, अशा संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

नागभीड, ब्रह्मपुरी तालुक्यात साडेतीन हजार मृतांची नावे मतदार यादीत

नावे कमी करण्याची प्रक्रिया सुरू; २० ऑगस्टला नवी यादी प्रकाशीत

■ **महासागर प्रतिनिधी, नागभीड, दि. २६ :**

चिमूर विधानसभेत समावेश असलेल्या नागभीड आणि ब्रम्हपुरी तालुक्यात साडेतीन हजार मृत व्यक्तींची नावे मतदार यादीत होती. ही नावे कमी करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. एकदा मतदार यादीत नाव आले आणि तो व्यक्ती मृत झाला तरी, त्या मयत व्यक्तीचे नाव कमी करण्याची तसदी कोणीच घेत नाही. त्यामुळे या मयत व्यक्तींची नावे मतदार यादीत अशीच कायम राहतात. या मयत झालेल्या व्यक्तींच्या नावांमुळे मतदानाच्या टक्केवारीवर ही परिणाम दिसून येत असतो. ही बाब येथील तहसील प्रशासनाच्या लक्षात येताच मागील एप्रिल महिन्यात तहसील प्रशासनाने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची बैठक घेतली.

चिमूर विधानसभेत समावेश असलेल्या नागभीड तालुक्यात ११८ तर ब्रम्हपुरी तालुक्यातील ४१ मतदान केंद्र आहेत. मतदान केंद्र अधिकाऱ्यांच्या या बैठकीत केंद्रात कोण व्यक्ती मृत आहे, याची यादी बनविण्यास सांगितले. या सूचनेनुसार प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याने त्यांच्या केंद्रातील मृत व्यक्तींची यादी तयार केली आणि ती तहसील प्रशासनाकडे सुपूर्द केली. मतदान केंद्र अधिकाऱ्यांकडून आलेल्या माहितीनुसार दोन्ही तालुक्यातील १५९ केंद्रांतून तब्बल साडेतीन हजार मतदार मृत असल्याचे निदर्शनास आले. आता या मृत व्यक्तींची नावे मतदार यादीतून कमी करण्याची प्रक्रिया तहसील प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. २० ऑगस्ट २०२४ ला जी नवीन मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल, त्या यादीत या मृत व्यक्तींची नावे असणार नाही.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचे शुद्धीकरण व प्रमाणीकरण, नवीन मतदान नोंदणी, नावात दुरुस्ती आदी कार्यक्रमही सुरू आहेत. मतदारांनी आपले नाव यादीत आहे किवा नाही हे तपासून घ्यावे. तसेच नव मतदारांनी आपल्या नावांची मतदार यादीत नोंदणी करावी.

-प्रताप वाघमारे, तहसीलदार नागभीड.

खुनासारख्या गंभीर गुन्ह्यासाठी आता ३०२ नाही तर १०३ (१)

१ जुलैपासून होणार अंमलबजावणी; जुने खटले जुन्या तरतुदींनुसारच चालणार

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २६ :**

खुनासारखा गंभीर गुन्हा केल्यानंतर आता यापुढे ३०२ नव्हे, तर १०३ (१) कलम दाखल करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रियासंहिता यामध्ये काही बदल केले आहेत. या कायद्यामध्ये केलेल्या नव्या सुधारणा, नव्या तरतुदी, नवीन कलमे १ जुलैपासून लागू केली जाणार असल्याची माहिती आहे.

याबाबत गुन्हेविषयक अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांच्या मते या तीन नवीन कायद्यांमुळे देशभरात दहशतवाद, मॉब लिंचिंग आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या गुन्ह्यांसाठी शिक्षा अधिक कडक होणार आहे. नव्याने अंमलात येणाऱ्या भारतीय न्याय संहितेत २० नवीन गुन्हे समाविष्ट करण्यात आलेले आहेत, तर जुन्या आयपीसीमधील १९ तरतुदी काढून टाकण्यात आल्या आहेत. तसेच ३३ गुन्ह्यांमध्ये तुरुंगवासाची शिक्षा वाढविण्यात आली आहे. ८३ तरतुदींमध्ये दंडाच्या शिक्षेत वाढ करण्यात आली आहे. याशिवाय २३ गुन्ह्यांमध्ये अनिवार्य किमान शिक्षेची तरतूद करण्यात आली असून, ६ गुन्ह्यांमध्ये 'सामुदायिक सेवा' या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

यापूर्वीचे तीन ब्रिटिशकालीन कायदे म्हणजेच भारतीय दंडसंहिता आता भारतीय न्यायसंहिता या नावाने तर फौजदारी प्रक्रिया संहिताऐवजी भारतीय नागरी सुरक्षा संहिता आणि भारतीय पुरावा कायदा यापुढे भारतीय साक्ष अधिनियम या नावाने ओळखले जाणार आहेत. वरील सर्वच कायद्यांची तरतूद १ जुलैपासून लागू करण्यात येणार असली तरी यापूर्वी दाखल खटले जुन्याच तरतुदींच्या आधारेच न्यायालयात चालणार आहे.

नवीन कायदे अंमलबजावणीबाबत अभ्यास

केंद्र सरकारने आणलेल्या नवीन कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिस अधीक्षक नुरुल हसन यांच्या स्तरावरून तसेच सरकारी पातळीवरून मार्गदर्शन केल्या जात आहे. शिवाय नवीन कायदे अंमलबजावणीबाबत काही पुस्तके आणि संदर्भ लेखदेखील असून, या सर्वांचा अभ्यास पोलिस अधिकारी, कर्मचायांकडून केला जात आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार नवीन कायद्यांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

'हिट ॲण्ड रन'मध्ये ट्रक चालकांना दिलासा

हिट ॲण्ड रन प्रकरणाशी संबंधित तरतुदीची अंमलबजावणी न करण्याचा निर्णय ट्रकचालकांना केंद्र सरकारने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे वाहनचालकांच्या बाजूने हिंट ॲण्ड रन प्रकरणांशी संबंधित तरतुदीची अंमलबजावणी न करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या तरतुदींना ट्रकचालकांनी विरोध केला होता. कायद्यातील तरतुदी समोर आल्यानंतर ट्रकचालकांनी कलम १०६ (२) च्या तरतुदीला विरोध केला होता. अतिवेगाने आणि बेदरकारपणे वाहन चालवून एखाद्या व्यक्तीचा मृत्यू ओढवणाऱ्या आणि पोलिसांना घटनेची माहिती न देता पळून जाणाऱ्यांना १० वर्षाचा कारावास आणि दंडाची तरतूद आहे. ही तरतूद मात्र लागू करण्यात आलेली नाही. त्यामुळे वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

मनपा लिपिकाने केला सव्वाकोटीचा घोटाळा

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २६ :**

महापालिकेत कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनात घोळ करुन महापालिकेचे १ कोटी २७ लाख २६ हजार ९२७ रुपयांचा अपहार करणाऱ्या तत्कालीन पेंशन शाखेच्या लिपिकाविरुद्ध सिटी कोतवाली पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई मंगळवारी महापालिकेचे मुख्य लेखाधिकारी अतुल दलाल यांच्या तक्रारीवरून करण्यात आली.

अशोक गणेशराव सोळंके असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या सेवानिवृत्त लिपिकाचे नाव आहे. १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०२१ दरम्यान महापालिकेमध्ये अशोक सोळंके याने सेवेत नसलेल्या लोकांच्या खात्यात महापालिकेचे पैसे टाकले व ते व्याजासह संबंधितांकडून घेतले. ही रक्कम १ कोटी २७ लाख २६,९२७ रुपयांच्या घरात आहे. अशी तक्रार महापालिकेचे मुख्य लेखाधिकारी अतुल दलाल यांनी सोमवारी सिटी कोतवाली पोलिसांत दिली. त्यानंतर पोलिस अधीक्षकांच्या आदेशावरून सिटी कोतवाली पोलिसांनी या प्रकरणी आरोपी अशोक सोळंके विरुद्ध कलम ४०९, ४२० नुसार मंगळवारी गुन्हा दाखल केला.

गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक सुनील वायदंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक बी. सी. रेघीवाले, हेकॉ आतिष बावस्कर, पोकॉ नवलकार करत आहेत. वाल्मिकी सेनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल सारवान यांनी या प्रकरणाबाबत महापालिकेत अनेकदा माहिती मागितली. मात्र, महापालिका प्रशासनाने माहिती दडपून ठेवली. अखेर विद्यमान अकोला मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांची भेट घेऊन चर्चा करून निवेदन देण्यात आले. तेव्हा प्रकरणाला वाचा फुटली आहे.

तपास अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सोळंके याने महापालिकेतील काही कर्मचारी आणि काही बाहेरच्या लोकांच्याही खात्यात पैसे टाकले.

जाहीर नोटीस

महोदय,
मौजा-वाघोली (रिठी) पह.न. २३. भूमापन क्रमांक व उपविभाग २४. तह. उमरेड, जि. नागपूर आराजी ०.९७ हे. आर. भोवर्ग १ असलेली शेतजमीनीचा सौदा करण्याबाबत.

आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. विजय डहाके व सौ. मीरा पांडे यांनी श्री. नरेंद्र शंकरलाल कपूर रा. विरली, तह. उमरेड, जि. नागपूर यांच्या मालकीच्या व यांच्या कब्जात असलेली शेतजमीन मौजा-वाघोली (रिठी) प.ह.न. २३. भुमापन क्रमांक व उपविभाग २४, तह. उमरेड, जि. नागपूर आराजी ०.९७ हे. आर. भोवर्ग १ असलेली शेतजमीन खरेदी करण्याचा सौदा करून टोकन बयाना केलेला आहे. या शेतजमीन वर इतर कोणाचाही हक्क, बोझा वारसान हक्क, बक्षिस, गहाण, कर्ज, टोकन, करार किंवा कोणत्याही प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्या सहीत खालील पत्यावर प्रत्यक्ष संपर्क साधावा. मुदतीनंतर या मालमत्तेबाबत कुणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप / उजर माझे पक्षकारावर लागु व बंधनकारक राहणार नाही व माझे पक्षकार आपल्या नावाने सदर शेतजमीनीचा सौदा पक्का करून सदर शेतजमीनीचे करारपत्र / विक्रीपत्र नोंदणी करून घेतील.

अडव्होकेट योगीता गुरव
ऑफिस पता १०७, पवनसुत नगर
रमणा मारोती मंदिर जवळ,
नागपूर-४४०००९
मो. 9373447109, 8411920060

निर्घृण हत्येचे तीव्र पडसाद

माजी खा. रामदास तडस व देवळीकर जनतेची पोलीस स्टेशनवर धडक

नागपूर सुधार प्रन्यास

जाहीर सूचना

या जाहिर सुचनेद्वारे सर्व संबंधिताना सुचित करण्यात येते की, प्रन्यास दस्तावेजानूसार ई.डब्ल्यू.एस. योजने अंतर्गत खसरा क्रमांक 6/2, 7/2 मौजा-बिनाखी लेआउट मधील भूखंड क्रमांक 395 चे वाटप **श्री. रमेश बालाजी निकोसे** यांचे नावे दि. 08/08/1997 रोजी करण्यात आलेला आहे. वाटपधारी श्री. रमेश बालाजी निकोसे यांचा दिनांक 28/04/2021 रोजी मृत्यू झाला असून मृत्यूपूर्वी वाटपधारी यांनी वारसदार श्री. मनोज रमेश निकोसे व श्री. विशाल रमेश निकोसे यांचे नावे दि. 22/06/2009 रोजी पंजीबध्द मृत्यूपत्र (विलडीड) करुन दिलेला आहे. परंतु वाटपधारी श्री. रमेश बालाजी निकोसे यांची **पत्नी श्रीमती अंजना रमेशचंद्र निकोसे** यांनी दि. 16/09/2021 रोजी अर्ज सादर करुन भूखंडक्राचे विक्रीपत्र किंवा फेरफार करण्याचे व्यवहार करु नये, असे नमुद केलेले आहे. वाटपधारी यांचे वारसदार म्हणून **श्री. मनोज रमेश निकोसे व श्री. विशाल रमेश निकोसे** यांनी सदर भूखंडक **शेख शकील शेख हुसेन** यांना पंजीबध्द विक्रीपत्र करुन दिला. तेव्हा अर्जदार **शेख शकील शेख हुसेन** यांनी प्रन्यास अभिलेखात नावाची नोंद करण्याबाबत विनंती केलेली आहे. अर्जदाराने वारसांन न्यायालयीन शपथपत्र, सिटीसर्वेची आखिव पत्रिका, पंजीबध्द विक्रीपत्र व मा. न्यायालयाचे आर.सी.एस. कं.621/2006 चे निकालाची प्रत सादर केलेली आहे. त्यांच्या आवेदनपत्रानुसार वरील भूखंड त्यांचे नावाने हस्तांतरण करण्याची कार्यवाही प्रन्यासचे विचाराधीन आहे.

करिता वरील भूखंडकावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, बोजा, जप्ती, भार, अधिकार, बक्षिसपत्र, गहाण, विक्रीपत्र, विक्रीचा करारनामा, धारणाधिकार अथवा इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार किंवा हक्क असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप सचिव-1 (संपत्ती विभाग), मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, सदर नागपूर - 440001 यांचेकडे ही जाहीर सूचना प्रकाशीत झाल्यापासून 15 दिवसांचे आत संबंधित भूखंडाचे कागदपत्रासह पाठवावा किंवा कार्यालयीन दिवशी दुपारी 2.30 ते 5.30 या वेळेत प्रत्यक्ष भेटून लेखी आक्षेप किंवा उजर नोंदवावा, अन्यथा वरील भूखंडाचा कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हक्क व बोज्यापासुन मुक्त असल्याचे समजून **अर्जदार शेख शकील शेख हुसेन** यांचा नावाने प्रन्यास अभिलेखात नावाची नोंद घेतल्या जाईल, व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर ऐकल्या जाणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

स्वा./-
सचिव-1 (संपत्ती विभाग),
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

जाहिरात क्र. का.अ./15/2024-25
दिनांक : 26.06.2024

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: नागपूर

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 25.06.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. मेसर्स पुर्वी एंटरप्रायझेस (त्याचे प्रोप्रायटर शंकर सुंदरदास मोटवानी यांच्या तर्फे) 2. शंकर सुंदरदास मोटवानी 3. कृतिका शंकर मोटवानी	मालमत्तेच्या पत्त्याचे सर्व तुकडा आणि पार्सल: पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्रमांक C-1 चा समावेश असलेली सर्व आरसीसी सुपर स्ट्रक्चर, सुपर बिल्ट अप एरिया 55.76 चौ. मीटर्स, महालक्ष्मी अपार्टमेंट नंबर 1 म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि शैलीत असलेल्या इमारतीत भूखंड क्रमांक 506 वर बांधण्यात आले आहे, एकूण क्षेत्रफळ 450 चौ. मीटर (4843.8 चौ. फूट), येथे संपूर्ण जमिनीचा एक भाग असल्याने. क्रमांक 7, 9 आणि 10/1-2 मौजा इंदोरा, नागपूरच्या पाचपोली गृहनिर्माण योजनेतील - इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट, बेअरिंग सिटी सर्व्हे क्रमांक 15 आणि पत्रक क्रमांक 14, एनआयटीच्या मर्यादेत आणि एनएमसी बेअरिंग एनएमसी घर क्रमांक 3448/ए/डी/506/सी-1 प्रभाग क्रमांक 57, तहसील आणि जिल्हा नागपूर एकत्र 6.49% विभक्त वाटा आणि सांगितलेल्या जमिनीतील व्याज आणि सीमाबद्ध आहे खालीलप्रमाणे:-	H177542 5062101 2015/ H177542 5062101 2015L/ NGPHL2 0000104	28 मे 2024	रु. 3,28,910.10	रु. 59,74,259.61	रु. 32,89,101	सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून	30-07-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30

सीमा		
	पूर्व	9.00 मीटर रुंद रस्ता
	पश्चिम	पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्रमांक बी-1
	उत्तर	प्लॉट क्र. 505
	दक्षिण	पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्र. D-1

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **28/07/2024**रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या **10%** परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी **25%** रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **30/07/2024**रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **31/07/2024**भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या **75%** रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात म्हणजे, **नाव शेखर काळे, एल अँड टी फायनान्स लिमिटेड - कार्यालय क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे -411005 आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल अँड टी फायनान्स लि., - ऑफिस: 6 वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं 177, कलिना, उड्ड रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098** कोणत्याही ई-लिलावाच्या टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करून घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

दिनांक: 27.06.2024
ठिकाण: नागपूर

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

e-Tender Notice

Sealed & superscribed tender are invited in two bid system online from Registered Contractors for be maintenance of Urja Guest House, Bijli Nagar, Nagpur on full turnkey basis. The E-Tender (CE/NZ/T/2024-25/T-01), amount Rs. 120 Lakhs can be downloaded fromour websites **www.mahadiscom.in/etender.** from **27.06.2024 to 10.07.2024 .**
The employer reserve the right to accept any bid or reject all bids without assigning any reason therefore and without thereby incurring in any liability to bidder or bidder's . If any change in bid document / schedule the same will be displayed on MSEDCL website only. So prospective bidder are requested to regularly check the website.

Chief Engineer
Nagpur Zone, Nagpur

जाहिर सुचना

आम जनतेस सुचित करण्यात येते की खालील वर्णलेली दोन चाकी वाहन होंडा ॲक्टिव्हा जिचा RTO पंजिकरण नं. क्र. MH49 BH9612 असून चेसीस क्र. ME4JF49NKKW002204 व इंजिन क्र. JF49EW4008618 हे आहे. सदर दोन चाकी वाहन माझे पतीचे स्व. सिद्धार्थ माधवराव ढोले यांच्या नावे असून त्यांचे निधन दिनांक २४.११.२०२० ला झाला असून त्यांच्या पश्चात सदर दोन चाकी वाहन सौ. वैजयंतीमाला सिद्धार्थ ढोले (पत्नी) ह्यांच्या नावे करीत आहे. सदर दोन चाकी वाहणावर कोणत्याही प्रकारचा गहानपत्र, किंवा कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास सात दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदपत्रासह संपर्क साधावा. मुदत कालावधी संपल्यावर आलेल्या आक्षेप मान्य करण्यात येणार नाही.

संपर्क : सौ. वैजयंतीमाला सिद्धार्थ ढोले
पत्ता : फ्लेट नं. ४०१ साई एमेराल्ड जय दुर्गा सोसायटी,
मनीष नगर , नागपूर
मो.नं. ८९९९४७३११८

जाहिर सुचना

आम जनतेस सुचित करण्यात येते की खालील वर्णलेली दोन चाकी वाहन बजाज मोटर सायकल जिचा RTO पंजिकरण नं. क्र. MH31 FM6196 असून चेसीस क्र. MD2JUEXL4LCO60267 व इंजिन क्र. L93703759 हे आहे आणि चार चाकी वाहन हुंदाई मोटर कार जिचा RTO पंजिकरण नं. क्र. MH31FA 2066 असून चेसीस क्र. MALA841CLGM224110 व इंजिन क्र. G4LAGM249590 हे आहे. सदर दोन व चार चाकी वाहन माझे पतीचे स्व. श्री दुर्गाप्रसाद होलिराम आगासे यांच्या नावे असून त्यांचे निधन दिनांक १५.०१.२०२३ ला झाला असून त्यांच्या पश्चात सदर दोन व चार चाकी वाहन सौ. संजू दुर्गाप्रसाद आगाशे (पत्नी) ह्यांच्या नावे करीत आहे. सदर दोन व चार चाकी वाहणावर कोणत्याही प्रकारचा गहानपत्र, किंवा कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास सात दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदपत्रासह संपर्क साधावा. मुदत कालावधी संपल्यावर आलेल्या आक्षेप मान्य करण्यात येणार नाही.

संपर्क : सौ. संजू दुर्गाप्रसाद आगाश
पत्ता : प्लॉट क्र. २, दुबे लेआउट, मानव सेवा सोसायटी,
सेमिनरी हिल नागपूर ४४००६
मो.नं. ९३२६९३३३०५